## प्रकरण - चौथे

# देवदासी प्रथेविरुध्द स्वातंत्र्यपूर्वकाळात झालेले प्रयत्न

## प्रकरण - ४

# देवदासी प्रथेविरुध्द स्वातंत्र्यपूर्वकाळात झालेले प्रयत्न

१९ व्या शतकापासून स्त्रियांचे प्रश्न सोडविण्यासाठी अनेक सामाजिक सुधारणा चळवळी झाल्या. या चळवळीचा मुख्य हेतू नवीन समाज निर्माण करणे हा होता. स्त्रीमुक्ती चळवळीत अनेक समाजसुधारकांनी आपल्या परीने कार्य केल्यामुळे ही चळवळ टप्याटप्याने बदलत गेली. सुरुवातीच्या टप्प्यात राजा राममोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, गोपाळ गणेश आगरकर, न्या. रानडे इ. समाजसुधारकांनी सती, बालविवाह, केशवपन इ. प्रश्नांविरुध्द चळवळी केल्या. जे प्रश्न मुख्यत: हिंदू धर्मातील उच्च वर्णीय स्त्रियांशी संबंधित होते. परंतु महात्मा फुलेंचा अपवाद वगळता दलित स्त्रियांचे देवदासी सारखे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न कोणी केला नाही.

स्वातंत्र्यपूर्व काळात हिंदू धर्मशास्त्राच्या प्रभावामुळे अंधश्रध्देच्या चरकात अडकलेला दलित समाज व त्यातही दलित स्त्री देवदासीसारख्या अनेक प्रश्नांनी वेढलेली होती. स्त्री म्हणून व त्याहीपेक्षा दलित स्त्री म्हणून तिच्या दु:खाची जात वेगळी आहे हे महात्मा फुलेंनी प्रथम जाणले होते. विशेषत: अस्पृश्य जातीमध्ये देवदासी, मुरळया सोडण्याची जी अनिष्ट चाल आहे ती बंद करायला हवी असे मत त्यावेळी फुल्यांनी व्यक्त केले होते. १८८३ मध्ये महात्मा फुले यांना लहान मुलींची खंडोबा या देवतेशी लग्ने लावली जात असल्याचे समजताच त्यांनी तात्काळ मुंबई प्रांताच्या पोलीस कमिशनरशी संपर्क साधून लहान मुलींना देवाला सोडण्याचा हा प्रकार रोखण्याचा प्रयत्न केला. शेवटी ते या प्रयत्नांमध्ये यशस्वी झाले. ते नेहमी 'दीनबंधू' या वर्तमानपत्रामध्ये लेख लिहून सरकारने या प्रथांवर कायदेशीर बंदी घालावी यासाठी अपील करीत होते असे दिसते.[१] स्त्री मुक्तीच्या चळवळीत फुल्यांचे योगदान फार मोठे आहे. मानवी संस्कृतीत पुरुषांपेक्षा स्त्रीचे स्थान श्रेष्ठ आहे असा दावा फुल्यांनी केला होता.[२]

फुल्यांच्या नंतर दलित समजाला या अनिष्ट रुढीतून मुक्त करण्यासाठी थोर समाजसुधारक डॉ.रामकृष्ण भांडारकर यांनी प्रयत्न केल्याचे दिसून येते. डॉ. रामकृष्ण भांडारकर हे उच्चवर्णीय असून देखील त्यांनाही देवदासी, मुरळी स्त्रियांच्या मागासलेपणाची जाणीव झाली होती. त्यांनी मुलींना देवदासी

सोडण्याच्या प्रथेवर आणि मंदिरातून चालणाऱ्या त्यांच्या नाचगाण्यांवर सरकारने कायदयाने बंदी घालावी अशा आशयाचा अर्ज १९०५ साली इंग्रज सरकारकडे केला होता असे दिसते.[३]

१९०५ ते १९०७ च्या दरम्यानच्या काळात जेजुरी वगैरे ठिकाणाच्या मुरळया आपल्या ताब्यातील मुलींचे त्यांच्या अज्ञानावस्थेत देवांशी लग्न लावून देतात. नंतर त्यांना वेश्या व्यवसायास प्रवृत्त करतात. हे स्वत: डॉ. भांडारकर यांनी पाहिले होते. म्हणूनच त्यांनी इंग्रज सरकारकडे एखादा कायदा करुन अशा महिलांना कायदयाने शिक्षा करावी. अशी मागणी वरील अर्जाव्दारे केली होती. पण डॉ.भांडारकरांचा हा पुरोगामीपणा त्या काळात काही मंडळींना रुचला नाही.[४] म्हणून त्यांनी डॉ.भांडारकर यांच्यावर टीका करणारा व देवदासी, मुरळी प्रथेचा, वेश्याव्यवसायाचा पुरस्कार करणारा लेख वाई येथून प्रकाशित होणाऱ्या १९०६ च्या धर्म या मासिकात प्रसिध्द केला.

या लेखात असे म्हटले होते की, ' देवाच्या नावावर सोडल्या जाणाऱ्या देवदासी व मुरळया वेश्या व्यवसायासारख्या व्यभिचारी धंदयाकडे वळतात किंवा वळीवल्या जातात हे भंडारकराचे मत नाकबूल करता येणार नाही'. परंतु समाजात नीतिमत्ता अबाधित राहण्यासाठी आणि प्रतिष्ठित घराण्यांतील स्त्रियांच्या शीलांचे संरक्षण होण्यासाठी देवदासी आणि मुरळया सोडण्याची प्रथा आणि वेश्याव्यवसाय आवश्यक आहे. पुरुषांची लैंगिक भावना भागविण्याचे वेश्या हे एक साधन आहे तो व्यवसाय जगातील प्रत्येक देशामध्ये आहे. मग हिंदुस्थान हाच देश त्यासाठी अपवाद का असावा?[५] एकूणच उच्चवर्णीय मंडळींच्या हव्यासापोटीच ही प्रथा वाढण्यास प्रोत्साहन मिळत गेल्याचे दिसून येते.

डॉ. रामकृष्ण भांडारकरांचे निकटचे स्नेही महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांना देखील समाजातील अशिक्षीत देवदासी, मुरळयांची जाणीव झाली होती. डॉ. भांडारकर व विठ्ठल रामजी शिंदे हे समकालीन समाजसुधारक होते. शिंदे यांनी ही प्रथा अमानवी ठरवून त्याविरुध्द प्रचार सुरु केला. त्यांच्याच काळात महाराष्ट्रांमध्ये सर्वधर्मीयांची पश्चिम हिंदुस्थानातील मुलींचे रक्षण करणारी संस्था स्थापन झाली. मुंबईचे बिशप हे तिचे अध्यक्ष होते. उपाध्यक्ष पदावर नारायण चंदावरकर, जी.के. पारख व भालचंद्र कृष्णा हे होते. वि.रा. शिंदे हे या संस्थेचे चिटणीस होते. समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन चळवळ उभारल्यास या प्रथेला खिळ बसेल असे वि.रा.शिंदेना वाटत होते. निव्वळ राज्यसत्ता किंवा धर्मसत्ता यांच्याकडून हे काम होणार नाही असेही त्यांना वाटत होते.[६]

तत्कालीन समाजामध्ये देवदासीची प्रथा फार मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात होती. देवांच्या नावाने किंवा तत्सम नावाने देवदासी सोडण्याची प्रथा बंद करण्याचा प्रश्न त्यांनी प्रथमत: समाजापुढे मांडला. तत्पूर्वी त्यांनी 'मुरळी अथवा पश्चिम हिंदुस्थानातील हिंदू देवळांतील अनीतिमूलक आणि बीभत्स प्रकार' नावाचा एक अभ्यासपूर्व लेख लिहला. या लेखात त्यांनी कोणत्या देवाच्या नावाने, कोणत्या भागामध्ये देवदासी, मुरळी सोडण्याची प्रथा आहे याची तपशीलवार माहिती दिलेली आहे.

या लेखात ते म्हणतात, हिंदू देवळांना लहान मुली वाहण्याची किंवा हिंदू देवांशी त्यांचा विवाह करण्याची जी अनिष्ट चाल आहे ती पुरातनकाळापासून चालत आली आहे. बहुतेक करुन ही चाल वांझ बायकांमध्ये नवसेपोटी निर्माण झाली असावी. गेल्या १० वर्षात म्हणजे १९०१ ते १९११ या काळात मुरळयांची संख्या १००० वरुन ३०० वर आली आहे. शिक्षणाचे प्रमाण जसजसे वाढत आहे तसतशी ही चाल कमी होत आहे. परंतु ज्या लोकांमध्यें शिक्षणाचा प्रसार फार हळू आहे त्या लोकांत ही चाल हळूहळू कमी होत आहे. सरकारने ही चाल बंद करण्यासाठी तीव्र उपाय योजले पाहिजेत. शेवटी ते म्हणतात, देवाला वाहण्याच्या या चालीचे अप्रत्यक्षरीतीने काही अनिष्ट परिणामही होतात. चांगल्या आई बापांच्या मुली देवाला वाहिल्यामुळे त्या कसबिणी होतात. इतकेच नव्हे तर ज्या अगोदर वेश्या होऊन बिघडलेल्या असतात. त्या आपला धंदा अधिक प्रतिष्ठित रीतीने चालावा आणि समाजामध्ये आपला अधिक राजरोसपणे शिरकाव व्हावा म्हणून त्या कोणताही विधी न करता मुरळ्या बनतात. मुरळ्या वाहण्याच्या या दुष्ट चालीच्या प्रतिकारार्थ ' इंडियन पिनल कोडची ३७२ आणि ३७३ ही कलमे असूनही ही चाल अद्यापही राहू दिली गेल्यामुळे त्या चालीचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष द्रुष्ट परिणाम झालेले आहेत. ते म्हणजे या चालीविरुध्द जो कायदा आहे त्याची अमंलबजावणी सक्तीने होत नाही व या चालीच्या उलट जोराचे लोकमत प्रक्षुब्ध केले जात नाही ही चाल केवळ खालच्या, मागासलेल्या म्हणजे भंडारी, कुणबी, धनगर, नाईक, कोळी, बेरड, डासर, कबालिगार, तळवार, महार, मांग, ढोर वगैरे या अस्पृश्य जातीमध्ये आहे. मुरळी अथवा जोगतिण ती स्वत: कदाचित खालच्या जातीतील बाई असेल पण तिचा उपभोग घेणारे सर्वच पुरुष खालच्या जातीतील असतील हे कशावरुन ! असेही ते म्हणतात.[७] म्हणूनच सरकारने, मिशनरी सुधारकांनी व परोपकारी संस्थानी ही चाल बंद करण्यासाठी आपआपल्या परीने प्रयत्न करावेत असा सल्लाही त्यांनी आपल्या लेखामध्ये दिला होता.

पुढे पश्चिम हिंदुस्थानातील मुलांचे रक्षण करणाऱ्या संस्थेचा उद्देश व कार्य लक्षात घेऊन या अनीतिमूलक प्रथेच्या विरुध्द सरकारने कायदाही केला. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी मुरळी सोडलेल्या मुलींना समाजामध्ये प्रतिष्ठित स्थान मिळावे. यासाठी अशा मुलींची लग्ने लावून समाजात पुर्नस्थापित करण्याच्या दृष्टिने प्रयत्नही केले. १८ एप्रिल १९०९ रोजी खडकी येथे राहणारे गणपतराव हणमंतराव गायकवाड या सधन तरुणाचा शिवूबाई वल्लद नावाच्या मुरळीबरोबर विवाह लावण्यात विठ्ठल रामजी शिंदे यांनी पुढाकार घेतला होता. अस्पृश्य समाजातील विविध जातीतील मुली प्राधान्याने मुरळया म्हणून देवाला वाहिल्या जात असत, म्हणून अस्पृश्य जातीतील लोकांचे या प्रथेविरुध्द लोकमत संघटीत करणे व मुरळया सोडलेल्या मुलींचे लग्ने लावून समाजात त्यांना पुन्हा प्रतिष्ठित जीवन जगण्यास मदत करणे. हे विठ्ठल रामजी शिंदेना आवश्यक वाटत होते. १८ एप्रिल १९०९ रोजी गणपतराव गायकवाड यांचा शिवूबाई नावाच्या मुरळी बरोबर जो विवाह झाला होता तो कोल्हापूरच्या अस्पृश्य मानलेल्या महार, मांग, चांभार, ढोर वगैरे जातीच्या लोकांना पसंत असून त्याला या लोकांची संमत्ती आहे असा ठराव देखील शिंदे यांनी मांडला. तर सखाराम राणोजी मांग यांनी त्यास अनुमोदनही दिल्याचे दिसून येते. [८]

पुढे त्यांनी १९११ मध्ये मुंबई प्रांतात मुरळी प्रतिबंधक परिषद भरविली होती.[९] त्यामध्ये त्यांनी अस्पृश्य लोकांनी आपल्या मुलींना मुरळया सोडू नयेत असे आवाहन केले होते. स्त्रीला देवाप्रमाणे मानले पाहिजे असे त्यांचे मत होते. ' मातृदेवोभव :' असे म्हणून केवळ चालणार नाही तर 'स्त्रीदेवोभव: ' असे म्हटले पाहिजे असे ते म्हणत असत. याशिवाय होळी उत्सवातील बीभत्सपणा त्यांनी नामंजूर केला होता. हे बीभत्सप्रकार बंद करण्यासाठी त्यांनी ' होलिका संमेलनाची' योजना केली. कारण अस्पृश्य वर्गाच्या काही काही वस्तीमध्ये शिमगा नसतानाही तेथे बीभत्स प्रकार दिसून येत होते. म्हणूनच त्यांनी ही होलिका संमेलनाची योजना राबविली. यादृष्टिने निरनिराळे कार्यक्रम आखून प्रयत्न चालविले त्यामुळे नागपूरमध्ये त्यांच्यावर बाका प्रसंग ओढविला रस्त्यामध्ये गाठून त्यांना जमावाने रंगाचे सचैल स्नान घडविले. [१०]

अशाप्रकारे सामाज सुधारण्याचे महत्वपूर्ण कार्य विठ्ठल रामजी शिंदेनी केले. त्यांच्या या विशाल कार्यावरुन असे दिसून येते की, आध्यात्मिक, सामाजिक ध्येयासाठी आयुष्यभर फकिरी पत्करणारी त्यांच्यासारखी विद्याविभूषीत व्यक्ती महाराष्ट्रात तरी दुसरी आढळून येणे कठीण आहे.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

जरी विठ्ठल रामजी शिंदे यांचे सामाजिक कार्य विशाल असले तरी त्याकाळामध्ये देवदासी प्रथा व अस्पृश्यता मोठया प्रमाणात होती. त्यावेळी दलित समाज परंपरांगत रुढी, अज्ञान व अंधश्रध्देच्या जात्याखाली भरडला जात होता. नाना प्रकारचे उपास-तपास,अनिष्ट रुढी, नवस यांनी पछाडलेला होता. दलित समाजाचे हे अध:पतन दूर करण्यासाठी १९०८ पासून अनेक सामाजिक कार्यकर्ते प्रयत्न करीत होते. त्यामध्ये लोकजागृती व प्रबोधन व्हावे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे परमस्नेही शिवराम जानबा कांबळे यांनी 'सोमवंशीय मित्र' हे मासिक चालवून त्याव्दारे दलितांवर, देवदासी व मुरळयांवर होणारे अन्याय, अत्याचार कसे अमानुष आहेत हे इतरांच्या लक्षात आणून दिले. त्यांनी प्रथम या मासिकामध्ये देवाला मुली सोडण्याच्या अनिष्ट प्रथेविरुध्द लेख लिहून १९०८ मध्ये प्रथमत: बंड पुकारले. सोमवंशीय मित्र मासिकामुळे दलित समाजाला, अस्पृश्य स्त्रियांना, देवदासी/मुरळयांनाही चांगलीच जाग आली. कारण ज्या काही देवदासी/मुरळया होत्या त्यांची संख्या दलित समाजातच मोठया प्रमाणात होती.

शिवराम जानबा कांबळेंच्या लेखाची चांगली प्रतिक्रिया होऊन शिवूबाई वल्लद (पिता) लक्ष्मण जाधव सोनकांबळे नावाच्या मुरळीने आपल्या विवाहापूर्वी अतिशय उद्‌बोधक असे पत्र पाठविले. देवाला सोडलेल्या मुरळी मुलीचे दु:ख काय असते. हे त्या पत्रामध्ये सांगितले आहे. त्या पत्रात ती म्हणते, 'सोमवंशीय जातीमध्ये जी मुरळी सोडण्याची घातक चाल पडली आहे त्यामुळे आई - वडिल आपल्या पोटच्या मुलींना खंडोबास अर्पण करतात. मुरळी होण्याची ही शिक्षा आई-वडिल आपल्या मुलींना देतात यात मुरळयांची चूक नाही. आई-वडिलच याबाबत दोषी आहेत. सर्वच मुरळया नसतात बहुतेकजणी कुलीन स्त्री प्रमाणे वर्तन करतात .... याशिवाय मुरळया मुसलमान किंवा ख्रिश्चन धर्मात जाऊन राहू लागल्या तर त्यांना या धर्मात सामावून घेतले जाते. त्यांच्या मुलांना चांगली वागणूक मिळते पण मुरळयांना आपल्या म्हणजे (हिंदू) धर्मात सामावून घेतले जात नाही. त्यांच्या मुलांना कुणी आपल्या मुली देत नाही तेव्हा तुमच्यासारख्या पुढाऱ्यांनी आमच्यावर टीका करुन हा प्रश्न सुटणार नाही. अंतरलेल्या व शरण आलेल्या आम्हां मुरळयांची जननिंदेच्या कचाटयातून सोडवणूक करुन त्यांचा शेवट गोड करण्यासाठी मुरळयांना पंचानी चांगल्या मार्गाला लावावे.... उच्च वर्गात आता पुर्नविवाह होतात, काडीमोड होतात, स्त्रियांचे मुंडन वगैरे करीत नाहीत, सती जात नाहीत हा जसा बदल झाला तशीच मुरळया सोडण्याची पध्दतही बंद करावी'.[११]

शिवूबाई वल्लद या मुरळीचे पत्र 'सोमवंशीय मित्र' मध्ये प्रसिध्द झाल्यानंतर या वृत्तपत्राचे संपादक शिवराम जानबा कांबळे यांच्याकडे बऱ्याच वाचकांची प्रतिक्रियात्मक पत्रे आली. त्यामध्ये श्रीपतराव रामजी थोरात यांनी मुरळी प्रथा बंद करणेविषयी लिहिलेले पत्र अत्यंत उल्लेखनीय आहे. थोरात यांनी हिंदू धर्मामध्ये धर्माच्या नावाखाली मुरळी सोडण्याची जी प्रथा आहे तिला पायबंद घातला पाहिजे. असा आशावाद व्यक्त करुन या अनिष्ट प्रथावर जे कडक शब्दात आसूड ओढले आहेत ते महत्वपूर्ण आहेत. खंडोबाच्या कृपा प्रसादाने मुले होतात, त्यातून मुलगी झाली तर ती ही देवाचीच असते मग तिचे लग्न देवाबरोबर कसे काय लावले जाते ? असा ही प्रश्न त्यांनी या पत्रामध्ये विचारला आहे.[१२]

शिवराम जानबा कांबळे यांची शिवूबाईच्या पत्रावरील प्रतिक्रियाही अतिशय महत्वाची होती. त्यांनी सर्व समाजाला, दलितांना असे आवाहन केले की, मुरळी सोडण्याच्या प्रथेचा मुलीच्या आईवडिलांनी, ज्ञातीबांधवानी नीट विचार करावा व मुरळया सोडणे हा आपल्या जातीला मोठा कलंक आहे तो सर्वांनी धुऊन काढावा असा उपदेश केला. त्यांच्या या उपदेशाचा लोकांच्या मनावर मोठया प्रमाणात परिणाम होऊन शिवराम तात्याबा तांबटे यांनी पत्र पाठवून शिवराम जानबा कांबळे यांचे या कार्याबद्दल आभार मानलेले दिसतात. शिवराम तात्याबा तांबटे आपल्या पत्रांमध्ये म्हणतात की, 'आपल्यामध्ये अत्यंत नीच चाल आहे. आपल्यातले भोळे भाविक लोक आपल्या मुलींना मुरळ्या, जोगतिणी करतात या नीच चालीमुळे सोमवंशीय जातीतील पुष्कळ भगिनी नीतिमार्ग सोडून उघडपणाने कसबपणा करतात. त्यामुळे पुढे त्यांची दुर्दशा होते. म्हणून मुरळ्या करु नयेत ज्या झाल्या आहेत त्यांना पवित्र करुन घ्यावे. मुरळ्यांना चांगल्या मार्गावर आणण्याचा प्रयत्न करावा '[१३] अशा प्रकारचे मुरळी प्रथेला वाचा फोडणारे पत्र श्री तांबटे यांनी शिवराम जानबा कांबळेंना लिहून आपली प्रतिक्रिया व्यक्त केल्याचे दिसून येते.

शिवराम जानबा कांबळे ही पत्रे ' सोमवंशीय मित्र' मध्ये केवळ प्रसिध्द करुन गप्प बसले नाहीत तर त्यांनी १ मार्च १९०९ च्या अंकात एक विनंती पत्रिका काढून समाजाला जाहीररित्या आवाहन केले. त्या विनंती पत्रिकेत ते म्हणतात,'मुरळ्या संबंधाने आमच्या वर्तमानपत्रांतून मागे जी चर्चा झाली आहे ती फक्त कागदावरच राहू नये म्हणून आमच्या ज्ञातीनीं आपल्या मुली खंडोबाच्या मुरळया किंवा यल्लम्माच्या देवदासी म्हणून सोडण्याबाबतचा सारासार विचार करावा. त्यांनी मुलींना मुरळया व देवदासी सोडू नये.

यापूर्वी ज्या सोडल्या गेल्या आहेत त्यांच्याबरोबर लग्न करण्याची ज्या पुरुषांची तयारी आहे त्यांना ज्ञाती पंचायतीकडून परवानगी असावी. या दोन गोष्टी मान्य असणाऱ्यांनी फॉर्म भरुन त्यावर सही करावी व तो फॉर्म आमच्याकडे पाठवावा.[१४]

विनंती पत्रिकेबरोबरच शिवराम जानबा कांबळे यांनी सरकारने एक जाहीरनामा काढून देवदासी, मुरळी प्रथेला पायबंद घालावा अशी मागणी केली होती. पुढे सरकारने एक जाहीरनामा काढून असे जाहीर केले की, इंडियन पिनल कोडच्या कलम ३७३ प्रमाणे जो कोणी १६ वर्षाच्या आतील अज्ञान मुलीस वेश्येचा धंदा करण्यास किंवा कोणत्याही अनीतिच्या कामासाठी विकेल किंवा तसा प्रयत्न करेल त्यास १० वर्षे सक्तमजुरीची शिक्षा देण्यात येईल. म्हणजेच पालकांनी आपल्या मुलींना मुरळ्या करु नये, त्यांना सन्मार्गाला लावले पाहिजे. अन्यथा सरकार अशा गुन्हेगार पालकांना दंड वा शिक्षा ठोठावेल. पुढे त्यांनी सोमवंशीय मित्र मध्ये ही माहिती देऊन सरकारला अशी विनंती केली की, सरकारने सद्या ज्या मुरळ्या आहेत त्यांचे एक रजिस्टर ठेवावे त्यात मुरळ्यांची नावे नोंदवावी व मुरळ्या झाल्याबद्दलचा दाखला घेऊन त्यावर मामलेदाराची सही घ्यावी. म्हणजे यामुळे कोणी आपली मुलगी नव्याने मुरळी करुन ती पूर्वीच मुरळी झाली होती असे म्हणून सरकारला फसवू नये. याशिवाय सरकारने आणखी एक गोष्ट करावी की, मुरळ्या, जोगतिणी वगैरे स्त्रिया रस्त्यावर बीभत्स लावण्या गाऊन भीक मागतात यास बंदी करावी. कसबिणीसंबंधी जे जे कायदे करण्यात येतील ते सर्व मुरळ्यांनाही लागू करावेत कारण त्याही उघड कसबिणी आहेत'.[१५] अशी विनंती त्यांनी सरकारकडे केली.

वरील कार्यावरुन शिवराम जानबा कांबळे व इतर कार्यकर्ते आपल्या समाजातील स्त्रियांच्या प्रश्नाविषयी किती जागरुक होते याची कल्पना येते. सर्वांत महत्वाचे म्हणजे अस्पृश्य समाजातील सुधारक केवळ नुसते भाषणावीर नव्हते तर ते कृतीशूरही होते. मुरळ्यांचे जीवन सुधारावे म्हणून शिवराम जानबा कांबळे यांनी जेजुरीला सोमवंशीय लोकांची परिषद भरवून पालकांनी मुरळ्या सोडू नयेत व त्यांची लग्ने करावीत असे ठराव गावोगावच्या पंचाकडून मंजूर करुन घेतल्याने अस्पृश्य समाजाचा मुरळीकडे पाहण्याचा दृष्टीकोनही हळूहळू बदलू लागला होता असे दिसते.

कदाचित त्यांच्या या बदललेल्या दृष्टीकोनामुळेच बहुतांशी लोक पुढे येऊन मुरळ्यांशी विवाह करण्याची तयारी दर्शवित होते. याचे उत्तम उदा. म्हणजे शिवूबाई वल्लद या मुरळीचा खडकीच्या गणपतराव

गायकवाड यांच्याशी विठ्ठल रामजी शिंदे व शिवराम जानबा कांबळे यांच्या मध्यस्तीने झालेला विवाह.[१६] कोल्हापूरात देखील ज्यांची मर्जी असेल त्या मुरळ्यांचे विवाह घडवून आणण्याचे प्रयत्न अस्पृश्य जाती करु लागल्या. अशातऱ्हेने मुरळ्यांचे विवाह स्वजातीत करुन घेणारे तरुण पुढे येत असतानाच मुसलमान धर्मातील लोक मुरळ्यांची निवड करुन त्यांना हक्कांचे घर व संसारसुख देत होते. याचे उदा. श्रीपतराव थोरात यांनी १ ऑगस्ट १९०९ च्या सोमवंशीय मित्र मध्ये दिले आहे. ते म्हणतात, १९ जुलै १९०९ रोजी कामाठीपुऱ्यात विठाबाई नावाच्या मुरळीने मुसलमान धर्माची दीक्षा घेऊन आपल्या मुसलमान प्रियकराबरोबर निकाह लावला हे वृत्त देऊन थोरात म्हणतात, "परधर्मात जाऊन निकाह लावण्यापेक्षा आपल्या जातीत राहून लग्न लावणे वाईट आहे का?"[१७] या गोष्टीचा सुधारणावादयांनी विचार करावा असे आवाहन त्यांनी या पत्रात केलेले दिसते.

त्याकाळात जेजुरी येथे खंडोबाच्या देवळात दरवर्षी जत्रेच्या वेळी मुरळया सोडण्यात येत असत. या प्रथेविरुध्द लोकमत जागृत करण्यासाठी शिवराम जानबा कांबळे यांनी १९०९ साली जेजुरी येथे महार लोकांची एक मोठी परिषद भरवून लोकांनी आपल्या मुलीला मुरळया करु नयेत आणि जे लोक मुरळयांबरोबर लग्न करण्यास प्रवृत्त होतील त्यांना जातीकडून अडथळा होऊ नये असा ठराव सर्व गावच्या महारांकडून पास केला. मुरळी प्रथेविरुध्द जे लोकमत जागृत होत होते त्याचा परिणाम येथील खंडोबाच्या जत्रेच्यावेळी पुढील वर्षीच दिसून आला. त्यावर्षी एकही मुरळी सोडण्यात आली नाही. पण मात्र अशी प्रथा बंद करण्याच्या प्रयत्नाला सार्वत्रिक मान्यता मिळणे ही गोष्ट कठीणच होती. कारण शिवूबाई या मुरळीचे लग्न गणपतराव गायकवाड याच्याशी लावल्याने येसूबीन काशीराम बटलर महार गोसावी हा गृहस्थ संतप्त झाला. तो गायकवाडयांच्या घरी गेला त्याने शिवूबाईला ओढून रस्त्यावर आणले व गायकवाड बायकोला सोडविण्यास आले असता त्यांनाही मारहाण केली. पण येसूबीन काशीराम गुन्हा शाबीत होऊन खडकी कॅंटोन्मेंट मॅजिस्ट्रेटने त्याला दीड महिना सक्त मजुरीची शिक्षा दिली.[१८]

त्याकाळात मुरळी करण्यावरही खटले कसे भरले जात होते याविषयी शिवराम जानबा कांबळे आपल्या १ डिसेंबर १९०९ च्या अंकात सांगतात की, 'मुंबई येथे कामाठीपुऱ्यातील पहिल्या गल्लीत 'महालू' नावाची एक सोमवंशीयबाई रहात होती. तिने स्वतः पालन करीत असलेल्या सुंद्री नावाच्या अकरा वर्षीय मुलीस मुरळी केले. सुंद्रीच्या भावाने मरताना माझ्या बहिणीस मुरळी कर असे आपणास

सांगितले अशी महालूने जबानी दिली. तरीही महालूला चार महिन्याची सक्त मजुरीची शिक्षा झाली. कोडांबाई व रामा या दोघांनी सुंद्रीस मुरळी होण्यास मदत केली. म्हणून त्यांच्यावरही खटला झाला होता पण पुराव्याअभावी ती दोघे सुटली.' [१९]

अशाप्रकारे पतित स्त्रियांना मुक्त करण्यासाठी ज्या समाजसुधारकांनी प्रयत्न केले त्यात शिवराम जानबा कांबळे यांचे कार्य महत्वाचे आहे. त्यांना देवदासी, मुरळी सुधारणा चळवळीचे आदयप्रवर्तक म्हटले तर त्यात वावगे ठरणार नाही. अशाप्रकारचे कार्य पुढे छ. शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने बहिष्कृत समाजानेही सुरु ठेवल्याचे दिसून येते.

साधारणत: त्या काळात या अनिष्ट प्रथा बंद करण्यासाठी निरनिराळया परिषदा, सभा, घेतल्या जात होत्या. त्यांच्यापैकी अशीच एक सभा जिल्हा बेळगाव, ता. हुक्केरी येथे घेण्यात आली याचा सविस्तर वृत्तांत असा आहे. तारीख १९/५/१९२७ रोजी जिल्हा बेळगांव, ता. हुक्केरी पैकी मुक्काम नेर्ली सरकारी चावडीत संध्याकाळी ४ वाजता श्रीयुत रुद्राप्पा बसाप्पा चलवादी लो.बो.मेंबर विजापूर यांच्या परीश्रमाने बहिष्कृत समाजाचे सुधारणेकरिता श्रीयुत शिवगौंडा भीमगौंडा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सभा भरली होती सभेत खालील ठराव पास झाले.

१) राजनिष्ठा २) जोगत्या, मुरळया सोडू नयेत व सध्या असलेल्या जोगत्या, मुरळयांनी लग्ने करुन घेणे ३) मृतमांस, उष्टे, मद्यपान सेवन करु नये व धर्मांतर करु नये ४) स्वच्छता ठेवणे व विद्या शिकणे ५) कर्नाटक बहिष्कृत संघाचे सभासद होणे व सार्वजनिक संस्थामध्ये प्रवेश करणे हे सर्व ठराव श्रीयुत रुद्राप्पा बसाप्पा चलवादी यांनी अनेक शिवचरणाचे वचनशास्त्र, पुराण, परिस्थितीच्या आधाराने सिध्द करुन दाखविले यांच्या उपदेशाचा परिणाम जमलेल्या अस्पृश्य लोकांवर होऊन पाच महार जोगत्या व मांग जोगत्या यांनी स्वखुषीने इच्छित पुरुषाबरोबर विवाह करुन घेतल्यानंतर सभा रात्री ९ वाजता विसर्जित झाली [२०] या वृत्तांतावरुन बेळगाव जिल्हयात हुक्केरी येथे मुरळी प्रथेविरुध्द सभा भरवण्याचे प्रयत्न कसे सुरु होते हे दिसून येते.

याच सुमारास अस्पृश्य जातीतील मुरळ्या, देवदासींचे वाढत चाललेले प्रचंड प्रमाण कोठेतरी बंद व्हावे. अशा प्रतिक्रियाही निरनिराळ्या पत्राव्दारे उमटत होत्या. असेच एक पत्र अनुसयाबाई कांबळे या स्त्रीने लिहिलेले आहे. ''पुढाऱ्याचे लक्ष जाईल काय'' ! या शीर्षकाचे ते पत्र आहे. 'आमच्या समाजात

देवाला मुरळ्या मुली सोडण्याची घातक रुढी ठरली होती. ती नाहीशी करण्याबद्दल पुण्याचे शिवराम जानबा कांबळे यांनी मनावर घेऊन ती चाल बंद करुन अनीतिला आळा घातल्याबद्दल कोणीही त्यांचे आभारच मानील. पण त्याचबरोबर खेदाची गोष्ट ही की, मुरळ्या, भृत्यांचा सुळसुळाट कमी होताच आमच्या गरती म्हणविणाऱ्या गरीब नवऱ्याच्या बायका दिवसा ढवळ्या आपली जातगोत सोडून परक्या जातीजवळ जन्म काढतात आणि मग त्यांचे पाप आमच्या गरीब जातबांधवानी स्मशनात पुरण्यास न्यावे ! हे किती लाच्छांनास्पद आणि आपल्या समाजाला घातक आहे. आपल्या जातीची सुधारणा व्हावी असे जर आपल्या पैकी निदान सज्ञानास तरी वाटत असल्यास त्यापैकी प्रत्येकाने ज्या बाया परजातीजवळ असतील त्यास व त्यांच्या सहाय्यकर्त्यास किंवा परजातीत गेलेल्यास पुन्हा फिरुन परत आणून पुणे, मुंबई येथील समाजात राजरोसपणे वावरणाऱ्यास व त्यांच्या सहाय्यकर्त्यास कायमचाच बहिष्कार घालून त्यांच्या कोणत्याही लग्नकार्यात जाऊन त्यास मदत न करणे हे आमच्या पुढाऱ्यांनी आपल्या जातिस्वाभिमानाचे आद्यकर्तव्य समजू नये काय ? आणि ते असेच स्वार्थावर दृष्टि ठेवून, अशा अनिष्ट प्रकारांकडे डोळेझाक करतील तर लवकरच आपली जात लुप्तप्राय होईल हे प्रत्येकाने लक्षात ठेवूनच आपल्या जातीच्या अभिमान राखून आपल्यांतील ही दुष्ट चाल बंद करावी'[२१] पत्राखाली अनुसया कांबळे असे आपले नाव व रास्ता पेठ, पुणे असा पत्ताही दिलेला आहे.

अनुसया कांबळे यांच्या पत्राला पाठिंबा म्हणून पुण्याच्या लक्ष्मीबाई बनशीव यांनी एक छोटेसे पत्र पाठविलेले होते. त्या पत्रामध्ये लक्ष्मीबाई बनशीव म्हणतात, ' ता. ११/९/१९२० च्या मूकनायकामधून अनुसयाबाई कांबळे यांचे पत्र वाचून मला फारच आनंद झाला तो सांगता येत नाही. खरोखरच आमच्या बायांची स्थिती फारच वाईट आहे. अशा या धाडशी बाया जातीची काहीच परवा करीत नाहीत त्यांना जातीची काहीतरी बंदी असावी म्हणून अनुसयाबाई प्रमाणे माझ्या प्रत्येक भगिनींने मनावर घेतल्यास, आपल्या जातीतील हे दुर्गुण लवकरच जातील अशी मला आशा आहे ! तसेच याकरिता समाजामध्ये राजरोसपणे वावरणाऱ्या काही बायास व त्यांच्या सहाय्यकारांस जातीची काहीतरी बंदी असावी, असे माझे मत आहे. पण मनावर कोण घेणार ? '[२२]

अशाप्रकारे लक्ष्मीबाई बनशीव यांनी आपल्या मुरळी प्रथेविषयी प्रतिक्रिया व्यक्त करुन आपल्या जातीतील प्रत्येक भगिनींने मुरळी न होण्याचे ठरविल्यास ही प्रथा बंद पडेल असा आशावाद देखील व्यक्त केलेला दिसतो.

एकीकडे अस्पृश्य समाजातील मुलींना मुरळी सोडले जात होते. तर दुसरीकडे आपल्या जातीतील मुलींना वाईट मार्गापासून परावृत्त करुन त्यांना सन्मार्गाला लावण्याचे प्रयत्न काही संस्था मार्फत चालू होते. यामध्ये नागपूर येथे १९२६ मध्ये 'तरुण महार संघ' स्थापन झाला होता. या संघाने आपल्या जातीतील ज्या २०-२५ मुरळया मुसलमान समाजात गेल्या होत्या, त्यांना आपल्या समाजात परत घेतले व त्यांची लग्ने लावून दिली. महानंदा नावाची वर्धाची महार मुलगी व मैना नावाची गोंडाची मुलगी या दोघींना नागपूरच्या गंगाजमना वेश्यालयातून काढून त्यांना पुण्याच्या सेवासदनात पाठवून शिक्षण देण्यात आले. पुढे त्या दोघीही नर्स झाल्या. [२३]

यावरुन त्या काळातील पुरोगामी विचारांच्या सुधारकांना अशा पतित स्त्रियांच्या उध्दाराविषयी तळमळ होती. शिवाय त्याकाळी स्त्रियांदेखील मागे राहिल्या नव्हत्या तर समाजातील स्त्रियांनी प्रतिष्ठितपणाने जगले पाहिजे यासाठी त्या सदैव जागरुक होत्या असे दिसून येते.

यातूनच पुढे १९२० नंतर अस्पृश्यांच्या व मुरळी/देवदासी प्रथेविरुध्दच्या चळवळीला गती आली. त्यामुळे १९२७ साली नेर्ली, १९२९ साली गडहिंग्लज व बेळगाव येथे अस्पृश्यांच्या परिषदा झाल्या. त्या परिषदांना महाराष्ट्र व कर्नाटकातील अनेक नेते मंडळी उपस्थित होती. बेळगावच्या परिषदेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. माधवराव सोळंकी, आण्णासाहेब लठ्ठे, सिताराम शिवतरकर हे नेते खास उपस्थित होते. त्या परिषदांमधून अस्पृश्यांनी आपल्या मुलींना मुरळया व देवदासी सोडू नये. ती प्रथा बंद करावी सरकारने मुरळया आणि देवदासी प्रथा प्रतिबंधक कायदयाची कडक अंमलबजावणी करावी असे ठराव पास करण्यात आले. [२४]

याच सुमारास बऱ्याच ठिकाणी अस्पृश्य मुलींना पळवून नेवून त्यांना वेश्या व्यवसायात ढकलण्याचे प्रमाण वाढले होते. यापैकीच नागपूरजवळील कामठी येथे आठवडयाच्या बाजारात बसणाऱ्या स्त्रियांवर तेथील मुस्लीम गुंड डोळा ठेवून दिवसाढवळया संघटितपणे अशा मुलींना पळवून नेत. या परिस्थितला तोंड देण्यासाठी कामठीचे कार्यकर्ते बाबू हरदास यांनी महार तरुणांना संघटित करुन

मुसलमानांपासून या मुलींचे संरक्षण करण्याचे प्रयत्न केले. या प्रयत्नांचा भाग म्हणून दलित महिलांनी स्थापन केलेल्या संघटनेतर्फे कामठी कचेरी बाजार येथे ता. २ /११/१९४० रोजी अस्पृश्य भगिनींची सभा झाली. कामठी येथे भरणाऱ्या मंडईत अस्पृश्य महिलांनी बसू नये हा विचार महिलांपर्यंत पोहचविण्यासाठी तसेच ' कचेरी बाजार भगिनी मंडळाची' स्थापना करण्यासाठी ही सभा आयोजित केली होती. अशा पतित स्त्रियांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधावे म्हणून पत्रके काढण्यात येत असत व जाहीरसभा घेऊन लोकांच्यासमोर हे प्रश्न चर्चिले जात. स्वधर्म, संरक्षण, व पतित स्त्रियांची सुधारणा या विषयावर नागपूर येथे ता. ७/१२/१९३० रोजी जाहीर अख्यान झाले त्यात सहानी जवजे डोमा महार या परित्यक्ता स्त्रीच्या अर्जावर विचार करण्यात आला. [२५]

अस्पृश्य समाजातील पुरोगामी विचारांचे समाजसुधारक, तरुण मंडळी, आपापल्या परीने देवदासी, मुरळ्यांच्या मुक्ततेसाठी प्रयत्न करीत होते. तसेच अनेक देवदासी व मुरळ्या आपल्या उध्दार करण्यासाठी नेते मंडळीना पत्राव्दारे आपल्या समस्या कळवत होत्या. त्यापैकी केरळच्या देवकी नावाच्या देवदासी नर्तकीने महात्मा गांधीना आपण हरीजन उध्दाराचे कार्य करीत आहात तेव्हा आपण आम्हा देवदासींचाही विचार करावा आणि उध्दार करावा असे अनावृत्त पत्र लिहिले. परंतु तिला कोणत्याही धर्मभिमान्याने आधार दिला नाही. शिवाय गांधीजीनीही तिच्यासाठी काही प्रयत्न केल्याचे आढळत नाही. शेवटी त्या देवदासी नर्तकीने ख्रिस्ती धर्म स्वीकारला. त्या धर्मातील लोकांनी तिला प्रतिष्ठेने वागविले शेवटी तिने त्या देवदासी प्रथेतून स्वत:ची मुक्तता करुन घेतली. [२६] यावरुन परिस्थितीच्या ओघाने देवदासी, मुरळ्या स्वत:ची या प्रथेतून सुटका व्हावी म्हणून दुसरा धर्म कशा प्रकारे स्वीकारत याचे वरील उत्तम उदाहरण आहे.

त्याकाळात दक्षिण महाराष्ट्राच्या काही भागात म्हणजे कोल्हापूर, कागल, गडहिंग्लज, चंदगड, भुदरगड याठिकाणी देवदासी प्रथेचा प्रभाव जास्त होता. ही अनिष्ट प्रथा १९२० मध्ये करवीर संस्थानाचे राजे छत्रपती शाहू महाराज यांनी आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. ज्यावेळी माणगाव येथे अस्पृश्यांची परिषद भरली होती, त्यावेळी त्यांनी जनतेला देवदासी, मुरळ्यांनीही गलिच्छ राहणीमान सुधारावे, मृत मांस खाऊ नये, अनीतिकारक वागू नये, प्रतिष्ठितपणाने जगावे, दररोज अंघोळ करावी, स्वच्छ रहावे. यामुळे रोगराईपासून संरक्षण होते. या शब्दांमध्ये उपदेशपर भाषण दिले होते. त्याचवेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनीही देवदासी, मुरळी प्रथेबाबत आपले मत व्यक्त करुन ही प्रथा किती वाईट स्वरुपाची आहे हे

त्यांनी दाखवून दिले. शाहू महाराज व डॉ.आंबेडकर यांच्या भाषणांचा येथील जनतेवर जबरदस्त परिणाम होऊन एस.एन.माने, देऊ इंगळे, बी.एच.वराळे, पी.आर. घटकांबळे, मारुती रावण, रत्नाप्पा सुर्यवंशी, आण्णाप्पा माळगे इ. कार्यकर्त्यांनी बेळगाव जिल्ह्यांमध्ये मुरळी व देवदासी प्रथेविरुध्द चळवळ जोमाने सुरु केली. त्यांनी १९२२ साली 'जोगता जलसा' काढून दलित समाजात जागृती केली. आपल्या दलित समाजाने मुलींना देवदासी, मुरळ्या करु नये, ती प्रथा बंद करावी, आपल्या मुलामुलींना शिक्षण द्यावे, गावात भीक मागू नये असा प्रचार केला. [२७]

छ.शाहू महाराजांनी करवीर संस्थानामध्ये १७ जानेवारी १९२० रोजी अनौरस संतती व जोगतिणीचा कायदा संमत केला. खरेतर त्यांनी हा कायदा १०/११/१९१९ रोजी केला होता पण तो १७ जानेवारी १९२० ला लागू करण्यात आला. देवाधर्माच्या नावावर मुलींना देवदासी,मुरळी, जोगतिण म्हणून सोडले जात होते या अनिष्ट रुढीमुळे, समाजाला एक भयानक असे हिडीस स्वरुप प्राप्त झालेले होते. सगळीकडे भ्रष्टाचार, अत्याचार वाढलेला होता. धर्माच्या नावाखाली अशी अमानवी कृत्ये घडत होती. म्हणूनच महाराजांनी जोगत्या, मुरळ्या प्रतिबंधक कायदा पास केला. याशिवाय जर कोणी या कायद्याचे उल्लंघन केले तर त्याला जबर शिक्षाही या कायदयानुसार सुनावण्यात आली होती.

**" अनौरस संतती व जोगतिणी संबंधी कायदा" ( १७ जानेवारी १९२० - गॅझेट तारीख)**

जनक बापाच्या मिळकतीवरील हिंदू अनौरस संततीचा वारसा आणि हिस्सा यासंबंधी आणि जोगतिण, देवदासी, अगर धर्माच्या नावावर सोडलेल्या इतर मुली यांनी पुरातन रुढीवरुन मिळविलेला दर्जा व त्या दर्जामुळे प्राप्त होणारे हक्क व कायदेशीर हितसंबंध रद्द करणारा कायदा. ज्यापेक्षा सामान्य नीतिचे संरक्षण करणे इष्ट आहे आणि अमुक एक मनुष्य क्षुद्र आहे की नाही हे ठरविणे कठीण व त्रासाचे आहे ते दूर करणे इष्ट आहे आणि जनक बापाच्या मिळकतीवरील वारसा व जन्मताच प्राप्त होणारा हक्क कायद्यानुसार शुद्राच्या अनौरस संततीस निराळा मिळतो तो फरक काढून टाकणे गरजेचे आहे आणि जोगतिणी व देवास किंवा धर्माच्या नावावर सोडलेल्या इतर मुली यांना पुरातन रुढीवरुन मिळणारे हक्क व कायदेशीर हितसंबंध रद्द करणे इष्ट आहे आणि कोल्हापूर इलाख्यातील सर्व हिंदूना यासंबंधी लागू होणाऱ्या हिंदू कायद्याचे एकीकरण करुन तो सर्वांना समसमान लागू करणे जरुर आहे त्यापेक्षा यावरुन खाली लिहल्याप्रमाणे कायदा पास करण्यात येत आहे. (संज्ञा अशी)

' या कायद्यास हिंदू वारसाच्या कायद्याच्या दुरुस्तीचा कायदा म्हणावा '

'स्थानिक व्यक्ती' हा कायदा सर्व कोल्हापूर इलाख्यात लागू आहे आणि तो तारीख १७ जानेवारी १९२० इ. पासून अंमलात येईल आणि कोल्हापूर इलाख्यातील सर्व हिंदू प्रजेला लागू आहे. या कायद्यामध्ये हिंदूमधील जैन, लिंगायत, आर्यसमाज, ब्राम्होसमाज वगैरे सुधारक धर्मीयांचा आणि वरीष्ठ वर्गातील (व्दिज) तिन्ही जातीचा व शुद्रांचाही समावेश होता.

हा कायदा कोल्हापूर इलाख्यातील दिवाणी, फौजदारी व मुलकी कोर्टात या कायदाचा अंमल तारखेस व अंमल तारखेनंतर अर्ज चालू असतील व चालू होतील. त्या सर्व अर्जांना लागू आहे. परंतु हा कायदा अंमलात येईल त्या तारखेच्या ज्या अनौरस मुलांचे वयास ८ वर्षे पूर्ण झाली असतील तर त्या मुलाच्या हक्काला व हा कायदा अंमलात येईल त्या तारखेच्या अगोदर ज्या जोगतिणीचे, अगर देवास अथवा धर्माच्या नावावर सोडलेल्या मुलीचे वयाला १२ वर्षे पूर्ण झाली असतील तर त्या मुलीच्या हक्काला अगर कायदेशीर हितसंबंधाना या कायद्याने कोणत्याही प्रकारची बाधा येणार नाही.

या कायद्यामध्ये प्रामुख्याने दोन कलमांचा समावेश आहे. ती कलमे अशी आहेत.

**कलम १ ले** - हा कायदा अंमलात येईल त्या तारखेपासून हिंदू कायद्याने मान्य केलेल्या ज्या तत्वावर वरील तीन जाती (व्दिज) तील अनौरस संततीला वारसा व हिस्सा मिळतो. त्याच तत्वावर हिंदू आईबापांपासून जन्मलेल्या अनौरस संततीला मग त्या संततीचा बाप अगर आई ब्राम्हण, क्षत्रीय, वैश्य, शुद्र अगर दुसऱ्या कोणत्याही जातीतील असो जनक बापाच्या मिळकतीवर वारसा व हिस्सा मिळेल आणि कोल्हापूर इलाख्यात राहणाऱ्या सर्व हिंदू-हिंदूमध्ये याबाबतीत यापुढे कसलाही फरक केला जाणार नाही.

**कलम २ रे** - जोगतिण, मुरळी, देवदासी, भावीण आदि करुन देवाला अगर देवळांत सोडलेल्या अथवा धर्माच्या नावावर अन्य तऱ्हेने सोडलेल्या कोणत्याही स्त्रिया, तिला अशारीतीने तिच्या जनक घराण्यात जे हक्क प्राप्त झाले असते तेच हक्क तिच्या जनक घराण्यात प्राप्त होतील आणि या कायद्याच्या अंमल तारखेनंतर तिला वर सांगितल्याप्रमाणे सोडल्यामुळे जे वारसाचे व इतर विशिष्ट हक्क प्राप्त झाले असते ते हक्क तिला प्राप्त होणार नाहीत अगर वर सांगितल्याप्रमाणे सोडल्यामुळे तिला जो कायदेशीर दर्जा प्राप्त झाला असता तो तिचा दर्जाही मान्य केला जाणार नाही.[२८]

असा हा दोन कलमी कायदा शाहू महाराजांनी केल्यामुळे या प्रथांना काही प्रमाणात खीळ बसल्याचे दिसून येते. एकंदरीत देवदासी, मुरळ्यांना स्वतंत्र अस्तित्व लाभण्यासाठी त्यांच्यासमोर मृगजळाचे नव्हे तर वस्तुनिष्ठ स्वप्न ठेवण्याचा हा प्रयत्न राजर्षी शाहू महाराजांनी केला होता. त्यांना सुरवातीपासूनच या स्त्रियांच्या दारिद्रयपणाची जाणीव होती ते स्वत: उच्चवर्णीय असून देखील त्यांनी अस्पृश्य समाजांचा, स्त्रियांचा विचार केलेला होता, त्यांच्या या कायद्यामुळे देवदासी, मुरळ्यांना जनक बापाच्या मिळकतीत प्रथमत: वारसा हक्क मिळण्यास सुरुवात झाली होती असे दिसते.

त्या काळामध्ये या प्रथेचे जाळे संपूर्ण महाराष्ट्रात व कर्नाटकाच्या सीमाभागात मोठ्या प्रमाणात पसरलेले होते. उच्चवर्णीयांपेक्षा महार, मांग, चांभार, ढोर, वडार, भुरटी, बुरड इ. मागासलेल्या जातीतल्या स्त्रियांचाच या प्रथेमध्ये भरमसाठ भरणा होता. अस्पृश्य जातीतल्या देवदासी, मुरळ्याचे हे प्रचंड प्रमाण पाहून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी चालविलेल्या क्रांतीकारी चळवळीतही या स्त्रियांच्या प्रश्नांकडे लक्ष केंद्रित केले. धर्मांतराचा विचार चालू असतानाच त्यांनी १५ जून १९३६ रोजी मुंबईमध्ये देवदासी, वाघ्यामुरळ्यांच्या परिषदेमध्ये त्यांनी ''भगिनींनो समाजाला बट्टा लावणाऱ्या धंदयापासून मुक्त व्हा'' ! असे आवाहन करणारे भाषण केले.

तारीख ३० मे ते जून १९३६ ला आयोजित मुंबई इलाका महार परिषदेत पास झालेल्या धर्मांतराच्या ठरावाचा पहिला आघात कामाठीपुऱ्यात वस्ती करुन राहिलेल्या मुरळ्या, जोगतिणी, देवदासी इ. समाजाने त्याग केलेल्या वर्गावर बसला. साधारणत: या वर्गातील सर्व स्त्रिया सदाचरणाने उदरनिर्वाह करण्यास असमर्थ झाल्यामुळे अनीतिकारक व्यवसायामध्ये पडल्या आहेत. महार परिषदेनंतर या स्त्रिया आपल्या परिस्थितीचा विचार करु लागल्या व त्यांनी स्वयंस्फूर्तीने एक खाजगी बैठक बोलविली व त्यामध्ये असे ठरविण्यात आले की, आपल्या व्यवसायातील बायांची व पुरुषांची एक सभा बोलवावी व डॉ.बाबासाहेबांना आमंत्रण द्यावे. त्याचप्रमाणे देवदेवतांना वाहिलेल्या सर्व वर्गाची पुरुष (वाघे, पोतराज, जोगते वगैरे ) स्त्रिया यांची एक सभा ता. १६ जून १९३६ ला रात्री पोयबावडीवरील दामोदर हॉलमध्ये भरली होती. सभेस स्त्रिया व पुरुष मिळून मोठा जनसमुदाय जमला होता व त्यामुळे दामोदर हॉल माणसांनी अगदी फुलून गेला होता. प्रारंभी काही देवदासी, मुरळ्या, पोतराज यांची भाषणे होऊन त्यांनी या व्यवसायापासून परावृत्त होण्याची विनंती आपल्या बंधूभगिनींना केली. काही वक्त्यांनी जाहीररीतीने असे

सांगितले की, आपण या व्यवसायातून पूर्वीच बाहेर पडलो असून आपण प्रामाणिकपणे निढळ्या घामाचा पैसा मिळवून आपला उदरनिर्वाह करीत असतो व यामुळे आपले जिणे स्वाभिमानाचे झाले आहे.

यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर टाळयांच्या कडकडाटात भाषण करण्यास उठले त्यांनी भाषणास सुरवात करताच सभागृहात एकदम शांततेचे वातावरण पसरले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या भाषणात म्हणाले, ' आजच्या सभेचे महत्व नुकत्याच भरलेल्या महारपरिषदेपेक्षा मला शतपटीने अधिक वाटते समाजाचा जो भाग अत्यंत टाकऊ गणला जातो असा तुमचा समाज आहे धर्माच्या नावाखाली अनैतिकरीतीने निर्वाह करणाऱ्या अशा तुम्ही स्त्रिया आहात, ज्यांचा स्वाभिमान लुप्त झालेला आहे, देहविक्रय करुन पोट भरणे हे ज्यांचे जीवनसर्वस्व आहे अशा वर्गाने जगात काय चालले आहे हे समजून घेण्याची जिज्ञासा दाखवावी व आपला चरित्रक्रम सुधारण्याची तयारी करावी ही गोष्ट खरोखरच तुम्हाला भूषणावह आहे आणि म्हणूनच महार परिषदेत २५,००० जनसमुदाय जमला मला त्याचे महत्व वाटत नाही पण आज तुम्ही येथे जरी ४००/५०० जमल्या असल्या तरी त्याचे मला अधिक महत्व वाटत आहे. आजच्या तुमच्या या सभेबद्दल मी तुम्हाला धन्यवाद देतो एवढया प्रस्तावनेनंतर मी मुख्य विषयाकडे वळतो. ' आज मुंबई शहरात महार समाजाला कोठे लज्जेने मान खाली घालावी लागत असेल तर तुमच्या या कामाठीपुऱ्यातून जाताना आपल्या भगिनी त्या ठिकाणी इतर समाजाकडून आपली विटंबना कशी करुन घेत आहेत हे चित्र डोळयासमोर उभे रहिल्याशिवाय प्रत्येक महाराला खेद वाटल्याशिवाय राहणार नाही. तुम्ही आज महार समाजासमोर धर्मांतर करण्याची तयारी दाखविलेली आहे. परंतु या तुमच्या निश्चयाने माझ्या अनुयांयाची संख्या वाढली म्हणून मला आनंद वाटत नाही किंवा माझ्या या धर्मतरांच्या घोषणेस अधिकाधिक पाठिंबा मिळत आहे म्हणून मला समाधान वाटत नाही. आमच्या धर्मातरांचा अर्थ नीट लक्षात घ्या. आम्ही धर्मांतर करीत आहोत ते या दुर्गंधीच्या वातावरणातून बाहेर पडण्याकरिता करीत आहोत. सर्वांना समतेचे, बंधुत्वाचे व स्वाभिमानाचे व आदर्श जीवित लाभून त्यांचा आयुष्यक्रम उज्ज्वल व्हावा यादृष्टीने आम्ही धर्मातरांस तयार झालो आहोत तुम्हाला जर आमच्याबरोबर यावयाचे असेल, तर तुम्ही प्रथम हा आपला दुंर्गधित आयुष्यक्रम सोडून दिला पाहिजे. तुमच्या मलिनवृत्तीचा तुम्ही त्याग केला पाहिजे. हे करण्यास तयार असेल तर तुम्ही आमच्याबरोबर या, नाहीतर तुम्ही आमच्याबरोबर येऊ नका वाटल्यास तुम्ही आहात त्याचठिकाणी रहा. तुम्ही मुसलमान व्हा किंवा ख्रिश्चन व्हा आमची त्यास काहीच हरकत नाही. परंतु जर आमच्या बरोबर तुम्हांस यायचे असेल तर काया, वाचा, मन यांची शुध्दी

करुन व त्रिशुध्दीने शुचिर्भूत होऊनच तुम्हांला आमच्याबरोबर येता येईल नाहीतर मी स्वत: तुम्हाला स्पष्टपणे सांगातो की, तुम्हांला आमच्याबरोबर येता येणार नाही मी तुम्हांला येऊ देणार नाही. जर तुम्ही आपला आयुष्यक्रम पूर्ववत चालू ठेवून महार जातीला बट्टा लावण्याचे कार्य सोडणार नसाल तर मी तुम्हांस बजावून सांगतो की, हाजारो तरुण स्वयंसेवक तयार करुन मी स्वत: तुमच्या कामाठीपुऱ्यातून उठाव करीन. तुम्हांला आता समजले पाहिजे की, स्त्री जात ही समाजाचा अलंकार आहे, प्रत्येक समाज हा स्त्रियांच्या चारित्र्याला अधिक मान देतो. आपली गृहिणी होणारी स्त्री ही उत्तम कुळातील असावी अशी प्रत्येकजण अपेक्षा करतो व तशीच भार्या मिळावी म्हणून खटपट करतो. कारण त्याला माहित असते की, आपला व आपल्या कुटुंबाचा आणि कुळांचा नावलौकिक स्त्रियांच्या शिलांवर अवलंबून आहे इतकी मोठी थोरवी स्त्रीवर्गाला प्राप्त झाली आहे. परंतु तुमच्या कामाठीपुऱ्यातील चरित्रक्रम पाहिला तर समाजाला आणि स्त्रीजातीला काळिमा फासण्यासारखा आहे. म्हणून तुम्ही स्त्रियांचे समाजात काय स्थान आहे हे जाणून आपल्या मलिन आयुष्यक्रमाचा त्याग केला पाहिजे. तुम्ही कदाचित असा प्रश्न कराल की, हा धंदा आमच्या उपजीविकेचे साधन आहे. इतकेच नव्हे तर या धंदयामुळेच आज आम्हांला कशाची ददात नाही. आमचे आयुष्य सुखाने चालू आहे आम्हाला यात नोकरचाकर वगैरे सुखसोयी आहेत. असा ऐषारामाचा व थाटामाटाचा चरित्रक्रम सोडून आम्ही काय करावे ? ज्यावेळी मी तुम्हास हे लाजिरवाणे जिणे सोडण्यास सांगतो त्याचवेळेस असेही निक्षून सांगतो की, तुम्हाला उपजीविकेची साधने उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी मी घेणार नाही. हजारो स्त्रिया गरीब नवऱ्यांशी लग्न लावून त्यांच्या सहवासामध्ये अठराविश्वे दारिद्रयात दिवस कंठित आहेत. त्यांना पोट भरण्याकरिता हरएक तऱ्हेचे कष्ट करावे लागतात. हजारो स्त्रिया, गिरण्या, कारखाने यात नोकरी करुन संसारातील इतर हालअपेष्टा भोगून आपल्या मुलांबाळात गरिबीने अर्धपोटीही राहतात. परंतु त्या स्त्रिया तुमच्या धंदयात सुख लाभते म्हणून त्यात शिरत नाहीत. त्या तसे का करीत नाहीत ? दु:खे का सहन करतात ? याचा तुम्ही विचार करा. महाभारतातल्या कथा तुम्ही ऐकल्या आहेत. ज्यावेळी पांडव युध्दात हरले त्यावेळेस ते वल्कले, मृगचर्म धारण करुन वनवासात जाण्यास निघाले. त्यांच्याबरोबर तीच वस्त्रे परिधान करुन द्रौपदीदेखील होती. वाटेत कौरवापैकी दुर्योधनाने तिला म्हटले, ' द्रौपदी या मूर्ख नवऱ्याबरोबर सहवास करुन तू आपले हाल का करुन घेतेस ? तुझ्या सुकुमार देहाला का कष्ट देतेस ? तू मजबरोबर रहा मी तुला पूर्ण ऐश्वर्यात ठेवीन व तुला काडीचेही दु:ख होणार नाही' पण त्यावेळेस मानी साध्वी द्रौपदीने दुर्योधनाला जे उत्तर दिले ते तुम्ही लक्षात ठेवले

पाहिजे ती म्हणाली, ' जर मला नीतिने आयुष्यक्रम कंठिता येत नसेल तर मला ऐश्वर्य नको, राजवाडयापेक्षा कष्टमय वनवास मला अधिक प्रिय आहे.' तुम्हीदेखील हाच बाणा बाळगला पाहिजे. तुम्ही कष्ट करण्यास का भ्यावे? तुमच्या इतर हजारो भगिनींप्रमाणे आपपल्या गावी जाऊन किंवा नोकऱ्या करुन काबाडकष्टाने उपजीविका करण्यास तुम्हास जड का वाटावे ? तुम्हाला आपल्या जातीचा अभिमान का नसावा ? हे स्वत:चे विटंबना करणारे व जातीला काळिमा फासणारे जीवित तुम्ही का सोडू नये ? तुमच्या या लांच्छनास्पद धंदयाने संपूर्ण महार जातीला किती लाज आणली आहे याची कदाचित तुम्हाला कल्पना नसेल पण आम्हांला हरघडी तुमच्यामुळे मान खाली घालावी लागते काही वर्षापूर्वी कामाठीपुऱ्यात मी एका सभेला गेलो होतो त्यावेळेस माझे मित्र डॉ. सोळंकीही हजर होते. शिक्षणाविषयी भाषण करताना मी म्हणालो होतो की, सरकार शिक्षणाच्या बाबतीत मुसलमानांना उच्च सवलती देते त्या अस्पृश्य समाजास देत नाही. ही गोष्ट अगदी खरी आहे.त्या ठिकाणी काही मुसलमान गृहस्थ हजर होते. यापैकी एकाने सांगितले की, महारास मुसलमांनाविषयी का वैषम्य वाटावे ? आम्ही दोन-दोन, चार-चार म्हारणी ठेवतो. या बोचक वाक्याचे प्रत्युत्तर मी दिले नाही. पण या वाक्याचे मला किती वाईट वाटले असेल याची तुम्हीच कल्पना करा. मला कोणत्या गोष्टीची अतिशय चीड येऊन तळपायाची आग ही मस्तकात जात असेल तर या तुमच्या आयुष्यक्रमाची व कामाठीपुऱ्यातील राहणीची म्हणून मी तुम्हांस परत एकवेळ बजावून सांगातो की, 'तुम्हांस माणूस म्हणून जगायचे असेल तर हा गलिच्छ धंदा सोडलाच पाहिजे या धंदयामध्ये राहून तुम्हांस आमच्याबरोबर येऊ देणार नाही व इतके करुन तुम्ही ऐकणार नसाल तर मी तुमच्या ठिकाण्याहून उठाव केल्याशिवाय राहणार नाही तर तुम्ही ताबडतोब जागे व्हा व या हीन चरित्रक्रमाचा त्याग करा.

मला आशा वाटते ती ही की, आजची सभा तुम्ही स्वंयस्फूर्तीने बोलाविली आहे व आपली सुधारणा करुन घेण्यास उदयुक्त झाला आहात. तरी ही माझी अशा लवकर सफल होईल. अशी इच्छा प्रदर्शित करुन मी माझे भाषण संपवितो.' भाषण चालू असतानाच तेथे जमलेल्या स्त्रियांची अंत:करणे सद्‌गतीत झाली होती. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण अत्यंत स्फूर्तिदायक असे झाले नंतर सभेतील इतर कार्यभाग अटोपल्यानंतर सभा बरखास्त झाली. [२९]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हे भाषण अतिशय महत्वपूर्ण व प्रेरणादायी ठरले. त्यांच्या भाषणांचा येथील देवदासी,मुरळ्यांच्या मनावर खोल परिणाम झाला. त्यांच्यापैकी काही स्त्रिया आपला वेश्या

व्यवसाय सोडून बाबासाहेबांकडे गेल्या व आपण संसार करण्यास तयार आहोत असे त्यांनी सांगितले त्यानंतर डॉ.आंबेडकरांनी यापैकी अनेक वेश्यांची लग्ने लावून दिली. परंतु तरीही वेश्या व्यवसाय दलित समाजातून नष्ट करण्यास हे सर्व तुरळक प्रयत्न तोकडे ठरत असत. कारण या व्यवसायास धर्माचे अधिष्ठान होते आणि आजही आहे. ही रुढी दलित समाजातून नष्ट करायची असल्यास धर्माचा आधार प्रथम नष्ट करायला हवा याची जाणीव बाबासाहेबांस होती. म्हणून वेश्या सुधारणा वगैरे करण्याच्या भानगडीत ते पुढे पडले नाहीत. धर्मांतरानंतर देवाला मुली वाहण्याच्या प्रश्नच उद्‌भवणार नव्हता कारण हिंदूधर्माव्यतिरिक्त, इतर धर्मात मुलींना देवाला वाहण्याची प्रथा नाही. बौध्दधर्माचा स्वीकार केल्यानंतर धर्मांतरित महारांतून देवदासींची प्रथा समूळ नष्ट झालेली दिसते. जी आहे ती हिंदूधर्माव्यतिरिक्त असलेल्या अस्पृश्य व दलित समाजात. जे आंबेडकरांच्या मार्गाने गेले ते या दुष्ट रुढी परंपरेतून मुक्त झाले.[३०]

यावरुन असे दिसते की, देवदासी प्रथा ही केवळ हिंदूधर्मातील अस्पृश्य व मागासलेल्या जातीतच आहे. पण प्रत्यक्षात ही प्रथा कोणत्याही देवाने निर्माण केली नाही तर ती देवाच्या नावांनी माणसांनी, दलालांनी, निर्माण केली आहे. स्त्रियांचा शारीरिक भोग घेण्यासाठी पुरोहितशाही व राज्यकर्ते यांच्यातील संगनमतातून ही प्रथा जन्माला आली. जेथे देवाचे अस्तित्वच निर्जिव स्वरुपात आहे तो कधीच देवदासी, मुरळयांना जन्माला घालू शकणार नाही.देवदासी, मुरळ्या केवळ रेणुका, खंडोबा या देवीदेवतांना वाहिल्या जातात असे नाही तर सदैव बालब्रम्हचारी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मारुतीलाही वाहिल्या गेल्या होत्या. असाही संदर्भ आढळतो. मारुतीच्या मूर्तीबरोबर मुलीची लग्ने लावण्याची बातमी मुंबईच्या वरळीच्या २ नंबर चाळीमध्ये राहणाऱ्या गिरीजाशंकर मारुती शिवदास यांनी पत्राव्दारे दिलेली दिसते.

' मारुतीच्या मूर्तीबरोबर मुलींचे लग्न ' अशा शीर्षकाचे ते पत्र असून त्यामध्ये मारुतीला देवदासी वाहिल्याचा वृत्तांत सविस्तर दिला आहे.

''मुंबई (वरळी) येथील पोस्टासमोरील प्रसिध्द देवळात शनिवार ता. १५/१०/१९२७ रोजी १०-११ वाजता वरळी डेव्हलपमेंट ६ नंबर चाळीतील कोंगाटी (कर्नाटकी) अस्पृश्य तीन मुलीचे (उलगम्मा, दामव्वा व दुर्गव्वा, दोघींचे वय १०-१२ वर्ष व एक १४ वर्षाची) या मुलींचे लग्न श्री मारुतीच्या मूर्तीबरोबर तेथील भट पुजारी याने व मुलींच्या आप्तांनी मोठ्या थाटामाटात लावले. त्या मुलींना यल्लम्मास (देवीस) जोगतिण सोडून पुढे त्यांना वाईट कर्माला लावण्याची त्यांच्या आप्तांची इच्छा होती. परंतु येथे यल्लम्मांचे

देऊळ नाही म्हणून त्याऐवजी देवळातील मारुतीस तेथील भट पुजाऱ्याने फुलांच्या मुंडावळ्या वगैरे बांधून देवळात लग्न लावले व दक्षिणा घेतली. लग्नाला आलेली वऱ्हाडी मंडळी मोठ्या प्रमाणात होती. सदर प्रमाणे देवळात हा अनाचार व गुन्हा होऊ नये म्हणून मी स्वत: तेथूनच जवळ उभ्या असलेल्या ७३३ नंबरच्या पोलीसास ही हकिकत कळवली. मुली अज्ञान असून त्यांना बेकायदेशीररीतीने कुमार्गास लावण्याचा प्रयत्न चालला आहे व मारुतीसारख्या परमपूज्य देवतेस भ्रष्टविण्याचा प्रयत्न चालला आहे. तरी आपण येथपर्यंत येऊन सदर दुष्कृत्यास अडथळा करावा व शक्य असल्यास खटला करावा म्हणजे अज्ञानी लोकांना अशा वाईट कृत्याबद्दल दहशत बसून पुन्हा त्यांच्या हातून अशी नीच पापकृत्ये घडणार नाहीत वगैरे वगैरे. त्या पोलीसांना मी समजावून सांगितले व देवळापर्यंत येण्याबद्दल विनवले. परंतु पोलीसांनी सांगितले की मला तिकडे जाता येणार नाही अगर याकामी काही करताही येणार नाही. तेंव्हा त्या पोलीसांना मी सांगितले की निदान तुम्ही चिल्ड्रेन प्रोटेक्शन कमिटीकडे टेलिफोनने तरी विचारा की हया कामी पोलीसांना काही करता येईल की नाही. परंतु टेलिफोन करण्याचेही त्या पोलीसांनी मनावर घेतले नाही. पुढे अगदी नाईलाजास्तव डिलाईड रोड पोलीस ठाण्यावर गेलो. परंतु त्यांनीही वरील पोलीसाप्रमाणेच आम्हाला काहीही करता येणार नाही असे उत्तर दिले. अनीतिमान व नीच लोकांकडून, भटांकडून देवाचा उपमर्द होत असताना व कायदयाने गुन्हाही (लहान मुलीस कुमार्गी लावण्याचा) होत असताना त्याला प्रतिबंध करण्यास पोलीसांकडून कसलेच सहाय्य मिळत नाही. मुंबई क्रिमिनल प्रोसिजर ॲक्टची आठवण देऊनही पोलीसांना गुन्हाच्या ठिकाणी येण्याससुध्दा कोणत्याही कायदयाचा आधार मिळू नये ही अत्यंत आश्चर्याची गोष्ट आहे. तरी सरकारकडून व आमचे हितेच्छू कौन्सिलर लोकांकडून वेश्यावृत्तीस आळा पडेल असा एखादा कायदा लवकर पास होईल काय ? अस्पृश्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन स्वार्थी, धूर्त गुंड लोक त्यास व त्यांच्या मुलास कुमार्गास लावतात. म्हणून अस्पृश्यांच्या स्थितीकडे पाहून ज्या जाती श्रेष्ठ म्हणविणाऱ्या लोकांचा सरकार योग्य बंदोबस्त करील काय ? गेल्या श्रावण महिन्यात वरळी डेव्हलपमेंट ११२ चाळीतील वैष्णवपंथी अस्पृश्य दिंडी पताका लावून नैवैद्य घेऊन त्याच देवळात देवदर्शनासाठी गेले पण त्यावेळी भटपुजाऱ्याने कोणलाही देवदर्शन घेऊ दिले नाही. सडकेवरील पायऱ्यावर तो उभा राहिला आणि देवळातच नव्हे देवळाच्या अंगणात कुणालाही येऊ दिले नाही आता तोच भटपुजारी अस्पृश्यांच्या मुलींना कुमार्गास लावण्याकरता धर्म-अधर्म, जात-पात, शिवता-शिवत, पाप-पुण्य वगैरे कशाकडेही लक्ष न देता अनीतिमान लोकांना खुशाल देवळात घेत आहे. यल्लम्मा, रेणुका

ऐवजी चिरंजीव, आजन्म ब्रम्हचारी परमपूज्य अशा मारुतीची विटंबना करुन त्याच्या उज्वल चारित्र्यास हा भट काळिमा फासत आहे. अशावेळी हे धर्मगुंड भट पुजारी स्वस्थ कसे काय बसले ? तरी हिंदू धर्माभिमानी खरे वीर पुढे सरसावून या अघोर कर्माचा जाब या धर्मकर्मभ्रष्ट अशा भटास विचारतील काय ?[३१]

पत्र लेखकाने अत्यंत कळकळीने या प्रथेविरुध्द आवाज उठवला होता. मंदिर प्रवेशास मज्जाव असणारी दलित स्त्री देवाशी लग्न करुन त्याची पत्नी कशी बनू शकते हा खरा प्रश्न होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९४६ मध्ये मुंबईतील कामाठीपुरा या धोकादायक भागामध्ये देवदासी, वेश्यांची दुसरी परिषद घेतली. या परिषदेला बरीच मंडळी हजर होती. यांचे अध्यक्ष डॉ.बाबासाहेबच होते. या परिषदेमध्ये त्यांचे भाषण अत्यंत प्रेरणादायी झाले ते म्हणाले,'मी तुम्हा देवदासी, वेश्यांचा उध्दार करण्याचा प्रयत्न करीत आहे. मी तुम्हा सर्व देवदासी,वेश्यांना, मुरळयांना आणि सर्व स्त्रियांना प्रतिष्ठा व न्याय, हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न करणार आहे '[३२] पण त्याच वेळेस म्हणजे १९४६ सालीच बाबासाहेबांच्यावर भारताची राज्यघटना लिहण्याची जबाबदारी पडली. त्यामुळे देवदासी, मुरळयांच्या प्रश्नांकडे लक्ष देण्यास त्यांना फारसा वेळ मिळाला नाही. तरीपण त्यांनी भारतीय राज्यघटनेत स्त्रियांना न्याय देणारे हिंदूकोड बील आणि कायदयाने इतर तरतूदी करुन त्यांना मानवी हक्क मिळवून दिले.

थोडक्यात स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा भाषणांचा देवदासी, मुरळ्या, वेश्यावर खोल परिणाम होऊन काहींनी तो धंदा बंद केला, काहींनी लग्न करुन आपला स्वतंत्र व्यवसाय सुरु केला आणि आपल्यावर लादले गेलेले वेश्यापण, देवदासीपण, मुरळीपण झुगारुन दिले. पण तरीही या प्रथा संपूर्णपणे बंद झालेल्या नाहीत. बेळगाव जिल्हयातील ऐगळी तालुक्यातील अथणी येथील गौराबाई या देवदासीने मुंबईत वेश्या व्यवसाय करुन खूप पैसा मिळविला होता. मुंबईला झालेल्या देवदासी परिषदेला ती हजर होती. तेथील बाबासाहेबांचे भाषण ऐकून तिच्या मनावर बराच परिणाम झाला होता. पुढे म्हातारपणी ती मुंबई सोडून ऐगळीला येऊन राहिली. तिच्याजवळ पैसे व दागदागिने होते. ती आजारी पडली तेंव्हा बाबासाहेबांचे दर्शन घ्यावे आणि आपल्याजवळील पैसा त्यांना अर्पण करावा अशी तिची इच्छा होती. तिने निपाणीचे बी.एच.वराळे यांना बोलावून घेऊन सांगितले 'वराळेसाहेब मला बाबासाहेबांना पाहायचे आहे. तेंव्हा मला माझ्या देवाचे दर्शन घडवा, त्यांना मी मिळवलेली मिळकत अर्पण करायची आहे' गौराबाईने आपली शेवटची इच्छा सांगितली ती ऐकून वराळेंना गहिवरुन आले

त्यांनी मुंबईला जाऊन डॉ.बाबासाहेबांना सर्व हकीकत सांगितली. नंतर बाबासाहेब ऐगळीला आले त्यावेळी गौराबाई शेवटच्या घटका मोजीत होती. वराळेसाहेब म्हणाले, ' गौराबाई बाबासाहेब आलेत ' हे ऐकून गौराबाईनी डोळे उघडले व त्यांना डोळे भरुन पाहिले. तिला तिच्या देवाचे दर्शन झाले. तिने पैसे व दागदागिन्यांची पिशवी बाबासाहेबांच्या पायाजवळ ठेवून बाबांच्या पायांना हात लावला. तिच्या डोळयांतून आनंदाश्रू वाहू लागले. त्यांनी गौराबाईचे सांत्वन केले व ते मुंबईला निघून गेले. गौराबाईने दिलेल्या पिशवीत १०,००० रुपये व १५,००० रुपये किंमतीचे दागिने होते, ते सर्व तिने बाबासाहेबांनी चालविलेल्या समाज कार्याला व देवदासी मुक्ती चळवळीला मदत म्हणून दिले होते. त्यामागे गौराबाईची कर्तव्यबुध्दी आणि देवदासींच्या मुक्तीची अपेक्षा होती. एका देवदासी वेश्येची दानत, सामाजिक बांधिलकीची कर्तव्यबुध्दी पाहून बाबासाहेबांनाही धन्यता वाटली.[३३]

शाहीर पठ्ठे बापूरावांनी बाबासाहेबांच्या कार्याला मदत देऊ केली. त्यावेळी बाबासाहेब त्याला ताडकन म्हणाले, '' काय रे बामन महाराच्या एका नाच्या पोरीला तमाशात नाचवून मिळविलेल्या पैशांची मला तू मदत देऊ पाहतोस ? ती मी घेणार नाही ! '' ते बाबासाहेबांचे परखड बोलणे ऐकून शाहीर पठ्ठे बापूरावंही खजील झाले.[३४]

या घटनेवरुन असे दिसते की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी एका वेश्येने दिलेली मदत स्वीकारली. कारण या मदतीमागे तिची कर्तव्यबुध्दी होती. तर शाहीर पठ्ठे बापूरावांनी दिलेली मदत त्यांनी नाकारली. कारण या मागे त्यांची दयाबुध्दी होती. बाबासाहेबांना कोणाची सहानुभूती, दयाबुध्दी नको होती. तर प्रामाणिकपणाची प्रत्यक्ष कृतीची गरज होती असे दिसते.

या सुमारास देवदासी मुलींना आश्रय देण्याचे काम काही ठिकाणी घडत होते त्यामध्ये कर्नाटकातील काका कारखानीस यांनी महत्वाची कामगिरी बजावली होती. त्यांनी कर्नाटकात देवदासीच्यांसाठी आश्रम स्थापन केला व या चळवळीला हातभार लावला.[३५] जेणेकरुन या अल्पवयीन, तरुण मुली शारीरिक भोगाला, आत्याचाराला, बलात्काराला बळी पडू नये व त्यांना आधार मिळावा म्हणूनच त्यांनी आश्रमाची सोय केलेली असावी असे दिसते.

अशाप्रकारे स्वातंत्रपूर्व काळातील देवदासी मुरळया प्रथा नष्ट करण्यासाठी महात्मा फुले, डॉ.रामकृष्ण भांडारकर शिवराम जानबा कांबळे, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, छत्रपती शाहू महाराज व

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अखंड प्रयत्न केल्याचे या संपूर्ण आढाव्यावरुन दिसून येते. या संदर्भात काका कारखानीसांचे प्रयत्नही उल्लेखनीय होते. तसेच देवदासी, मुरळ्यांना कोणाची सहानुभूती नको आहे तर त्यांना हवी आहे परिवर्तनाची कृत्ती. प्रत्यक्ष कृती ही भूमिका या थोर पाच समाजसुधारकांनी स्वीकारलेली होती. त्यांना ढोंगीपणा, पाखंडीपणा आवडत नव्हता. ते सर्वजण स्पष्टवक्ते होते. त्यांचे विचार देखील क्रांतीप्रवण आणि परिवर्तनवादी होते. दलित अस्पृश्य समाजामध्ये नव्याने परिवर्तन झाल्याशिवाय हा समाज सुधारणार नाही याचीही त्यांना जाणीव होती. त्यांच्या विचारानेच दलितांना, सर्वसामान्य स्त्रियांना, देवदासी, मुरळ्यांना परिवर्तनवादी कार्यकर्त्यांना आणि संघटनांना प्रेरणा दिलेली होती. त्यामुळेच देशामध्ये व महाराष्ट्रामध्ये स्त्रीमुक्ती व देवदासींच्या पुनर्वसनाची चळवळ स्वातंत्र्यानंतरच्या काळातही एका नव्या जोमाने सुरु झाली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या निधनानंतर जवळजवळ १३-१४ वर्षांनी देवदासी पुनर्वसन चळवळीला पुन्हा गती मिळाली. दलित जातीतीलच काही आधुनिक, पुरोगामी विचारांच्या तरुण मंडळीनी काही सेवाभावी सामाजिक संघटनांनी आणि कार्यकर्त्यांनी महाराष्ट्र व कर्नाटकात देवदासी पुनर्वसनाची चळवळ नव्याने सुरु केली. या चळवळीमुळेच देशाच्या निरनिराळया भागामध्ये विखुरलेल्या देवदासी,परितक्त्या स्त्रिया,वेश्या स्त्रिया संघटित होऊन आपल्या समस्या मांडू लागल्या. एकत्रीत येऊन काही कार्यकर्त्यांच्या आधारावर त्यांनी आपल्या मुक्ततेसाठी चळवळ सुरु केली.

<u>**देवदासी प्रथेविरुध्द स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये झालेले कायदे खालील प्रमाणे**</u> -

स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये देवदासी, मुरळया सारख्या अनिष्ट प्रथा मोठ्या प्रमाणात वाढलेल्या होत्या. त्या प्रथा मोडून काढण्यासाठी महात्मा फुलें पासून ते डॉ.बाबासाहेब आंबेडकरांपर्यंत सर्वांनी आपआपल्या परीने अखंड प्रयत्न केल्याचे दिसून येते. त्याचबरोबर शासकीय पातळीवर किंवा कायदेशीर पातळीवर कारवाई करण्याचा प्रयत्न झाला होता. या कायदयामुळे देवदासी प्रथा समूळ नष्ट झाली नाही तरी ही त्याला खीळ घालण्याचा प्रयत्न नक्कीच केला गेला.

स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये निरनिराळया समाजसुधारकांनी केलेल्या चळवळीमुळे देवदासी सारखी अनिष्ट प्रथा कायदयाने बंद करण्याचा पहिला प्रयत्न म्हैसूर संस्थानाचे राजे कृष्णराज वाडियार यांनी केला. त्यांनी आपल्या संस्थानात १८९२ मध्ये प्रथमत: देवदासी प्रथेविरुध्द आवाज उठविला या पध्दतीला धर्मशास्त्राची संमती आहे किंवा काय ? हे पाहण्यासाठी त्यांनी शास्त्रीपंडितांची एक समिती नेमली. हिंदूधर्मशास्त्रात या प्रथेला मुळीच आधार नाही. असा एकमुखी निर्णय त्या समितीने दिला. मग म्हैसूर

नरेशांनी १९१० मध्ये देवदासींच्या नृत्यावर बंदी घालणारा कायदा पास करुन ही चाल कायदयाने बंद केली. पुढे मद्रास, महाराष्ट्र, केरळ, उत्तरप्रदेश इ. प्रदेशामध्येही तशा प्रकारचे कायदे करण्यात आले.[३६]

स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये देवदासी प्रथेचे प्रस्थ सगळीकडे प्रचंड प्रमाणात पसरले होते. या काळातही ब्रिटीशांनी कायदा करुन ही प्रथा बंद करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. संयुक्त प्रांतात नाईक (दलित) जातीच्या मुलांना देवधर्माच्या नावावर अनैतिक मार्गाला लावण्याची जी रुढी होती ती इंग्रज सरकारने कायदयाने बंद केली.[३७] याशिवाय मद्रास, गोवा, त्रावणकोर या संस्थानामध्येही देवदासी प्रथेचे प्रस्थ मोठ्या प्रमाणावर होते. त्यामुळे १९२९ ला मद्रास सरकारनेही ही देवदासीची प्रथा कायद्याने बंद केली व १९३० मध्ये गोवा, त्रावणकोर या राज्यांमध्ये मुलींना देवदासी सोडण्यास बंदी करणारे कायदे पास करण्यात आले. याशिवाय १९३२ मध्ये मुंबई व सावंतवाडी मध्येही देवदासी प्रथेला विरोध करणारे कायदे पास करण्यात आले.[३८]

तत्कालीन परिस्थितीमध्ये संपूर्ण देशामध्ये वेगवेगळ्या संस्थानामध्ये देवदासी, मुरळी प्रथा मोठ्या प्रमाणात अस्तित्वात होती. त्यावेळी महाराष्ट्र हा मुंबई प्रांताचा भाग होता. १९६० मध्ये स्वतंत्र महाराष्ट्र अस्तित्वात आला. महाराष्ट्रातील करवीर संस्थानाचे राजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी देवदासी, मुरळ्या जोगतिणी या प्रथेविरुध्द १०/११/१९१९ रोजी कायदा पास केला पण तो ता. १७ जानेवारी १९२० ला लागू करण्यात आला. (अनौरस संतती व जोगतिणीचा कायदा. १७ जानेवारी १९२०) तत्कालीन परिस्थितीमध्ये निरनिराळ्या संस्थानामध्ये विशेषत: करवीर संस्थानामध्ये देवदासींच्या, मुरळ्यांच्या मुलांमुलींना ज्यांच्या पासून त्यांचा जन्म झाला आहे त्या जन्मदात्या पित्याचे नाव लावता येत नव्हते. शिवाय त्या मुलांना त्या जन्मदात्याच्या संपत्तीत वारसा हक्कही मिळत नव्हता. तेंव्हा करवीर संस्थानाचे राजे छत्रपती राजर्षि शाहू महाराज यांनी १७ जानेवारी १९२० रोजी वरील परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊनच प्रामुख्याने दोन कलमी कायदा पास केला.

**कलम १ ले** - हा कायदा अंमलात येईल त्या तारखेपासून हिंदूकायदयाने मान्य केलेल्या ज्या तत्वांवर वरील तीन जाती (व्दिज) तील अनौरस संततीचा वारसा व हिस्सा मिळतो. त्याच तत्वावर हिंदू आईबापासून जन्मलेल्या अनौरस संततीला मग त्या संततीचा बाप अगर आई ब्राम्हण,क्षत्रीय, वैश्य,क्षुद्र

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

अगर कोणत्याही जातीतील असो, जनक बापाच्या मिळकतीवर वारसा व हिस्सा मिळेल आणि कोल्हापूर इलाख्यात राहणाऱ्या हिंदू-हिंदूमध्ये यापुढे कसलाही फरक केला जाणार नाही.

**कलम २ रे** - जोगतिण, मुरळी, देवदासी, भावीण अदि करुन देवाला अगर देवाला सोडलेल्या अथवा धर्माच्या नावावर अन्य तऱ्हेने सोडलेल्या,कोणत्याही स्त्रीला,तिला अशारीतीने सोडलेले नसताना तिच्या जनक घराण्यात जे हक्क प्राप्त झाले असते तेच हक्क तिच्या जनक घराण्यात प्राप्त होतील आणि या कायदयाच्या अंमल तारखेनंतर तिला वर सांगितल्याप्रमाणे सोडल्यामुळे जे वारसाचे व इतर विशिष्ट हक्क प्राप्त झाले असते हे हक्क तिला प्राप्त होणार नाहीत वर सांगितल्याप्रमाणे सोडल्यामुळे तिला जो कायदेशीर दर्जा प्राप्त झाला असता तो तिचा दर्जाही मान्य केला जाणार नाही.[३९]

अशाप्रकारे हा दोन कलमी कायदा करुन छत्रपती शाहू महाराजांनी देवदासी, मुरळी प्रथा निर्मलून करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. याशिवाय पुढे देवदासींच्या विधीला बंदी घालणारा कायदा १९१० व देवदासी प्रथेचे उच्छांटन करणारा कायदा १९२२ या दोन्ही कायदयांचे एकत्रीकरण करुन एकच "देवदासी संरक्षण कायदा" १९३४ या नावाने तयार करण्यात आला. तो असा

**' देवदासी संरक्षण कायदा मुंबई (१९३४) ' -**

१. हा कायदा मुंबई देवदासी संरक्षण कायदा १९३४ या नावाने ओळखण्यात येईल.

अ) या कायदयाची व्याप्ती आता ( सर्व महाराष्ट्रात ) सर्व राज्यभर आहे.

२. या कायदयामध्ये जर काही तरी विरोध, तिरस्कारणीय असे संदर्भ असतील तर

अ) " या कायदयानुसार एखाद्या अविवाहित स्त्रिला एखाद्या हिंदू देवतेला, देवभावनेला, देवळांला किंवा इतर धार्मिक संस्थांना वाहिले जाते त्या स्त्रीला देवदासी म्हणतात".

ब) मंदिर म्हणजे - हिंदू समाजाने / इतर धर्माने जे काही एखाद्या जागेला वाहिलेले आहे ती जागा त्यांच्या धार्मिक उपासनेचे केंद्र आहे ते म्हणजे मंदिर होय.

क) ' स्त्री ' म्हणजे कोणत्याही वयाची मानवजातीतील स्त्री किंवा मुलगी

३. एखाद्या स्त्रीला देवदासी म्हणून अर्पण करण्याच्या हेतूने केलेल्या कोणताही विधीमुळे अथवा कृतीमुळे एखादी स्त्री देवदासी बनत असेल, तर त्या विधीला अगर कृतीला त्या स्त्रीने अनुमती दिलेली असो वा नसो तर असा विधी अथवा कृती या कायद्यान्वये बेकायदेशीर घोषित करण्यात

येत आहे. हिंदू कायदयाखालील कोणतीही रुढी, अथवा नियम याबाबतीत विरोधी असली तरीही असा विधी वा अशी कृती परिणामशून्य असेल.

४) हिंदू कायदयाखाली कोणतीही रुढी अथवा नियम विरोधी असली तरी एखादी स्त्री देवदासी आहे. म्हणून तिने केलेला विवाह अवैध ठरणार नाही आणि अशा विवाहसंबंधातून झालेली अपत्येही अनौरस असणार नाहीत किंवा ठरणार नाहीत.

५) जिला देवदासी, मुरळी, जोगतिणी, भावीण म्हणून वाहण्यात येणार आहे. अशी स्त्री सोडून इतर कोणी व्यक्ती वर कलम २ मध्ये नमूद केलेले विधी अथवा कृती पार पाडील किंवा त्यास परवानगी देईल किंवा अशा विधीमध्ये सहभागी होईल अशा व्यक्तीला गुन्हा शाबित झाल्यास १ वर्षापर्यंत सश्रम वा साध्या कारावासाची शिक्षा किंवा दंड किंवा दोन्ही (शिक्षा आणि दंड) होऊ शकेल.

(५ अ कलम ५ खाली नमूद केलेल्या शिक्षा पात्र गुन्हा दाखलपात्र असेल)

५) ब) या कायदयाच्या अंमलबजावणीसाठी सद्हेतूने केलेल्या किंवा अमंलबजावणी करण्याच्या इच्छेने कृती करण्याच्या कोणत्याही व्यक्तीविरुध्द कोणत्याही प्रकारचा खटला, कज्जा, अथवा कायदेशीर कारवाई करता येणार नाही.

६) १. जर एखादया देवदासीने नात्याने केलेल्या सेवेबद्दल तिला मोबदला म्हणून जमीन दिलेली असेल तेव्हा कलेक्टर (जिल्हाधिकारी) मुंबई खंडमुक्त मिळकतीचा कायदा (१८५२) किंवा जमीन महसूलातून मुक्तता (क्र.१) कायदा (१८५२) किंवा जमीन महसूलातून मुक्तता (क्र.१) कायदा (१८६३) आणि जमीन महसूलातून मुक्तता (क्र.२) कायदा (१८६३) किंवा या कायदयानुसार केलेले नियम किंवा सध्या अस्तित्वात असलेल्या कोणत्याही कायदयानुसार सरकाने किंवा सरकारतर्फे देण्यात आलेल्या कोणत्याही दान किंवा सनदीनुसार केलेल्या कोणत्याही निर्णयाचा विचार न करता विहित पध्दतीने याप्रकारे चौकशी करतील व नंतर लेखी आज्ञेने उपभोगासाठी अशा प्रकारची (देवदासी म्हणून) सेवा करण्याचे असलेले बंधन दूर करतील आणि जमिनीच्या मालकाला अशा सेवेऐवजी कलेक्टर योग्य त्या प्रकारे ठरवतील तो खंड मिळावा अशी सूचना देतील. [४०]

अशाप्रकारे स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये संपूर्ण देशभर देवदासी प्रथेविरुध्द कायदे झाले पण त्यांची अंमलबजावणी  काटेकोरपणे झाली नाही. ते कायदे फक्त कागदावरच राहिल्याचे दिसून येतात. धार्मिक अंधश्रध्दा आणि वेश्या व्यवसाय यामुळे कायदा अधिक प्रभावी झाला नाही असे दिसून येत नाही. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये जरी बऱ्याच समाजसुधारकांनी देवदासीच्या, मुरळयांच्या समस्यांना वाचा फोडली असली तरी या प्रथा समूळ नष्ट झाल्या असे म्हणता येणार नाही. जर कायदयाची अंमलबजावणी काटेकोरपणे झाली असती तर कदाचित या प्रथा नष्ट झाल्या असत्या पण तसे न झाल्याने ते कायदे कुचकामी ठरल्याचे दिसून येते.

अशाप्रकारे स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये देवदासी मुरळया आणि त्यासंबंधी केलेल्या कायदयाची स्थिती अशी मागासलेपणाची होती असे दिसून येते.

# तळटिपा आणि संदर्भ


१. डॉ. एन.डी. कांबळे - देवदासी इन बेळगाव डिस्ट्रिक्ट ए सोशोलॉजिकल स्टडी मे १९८८, पृ.क्र. २२८.

२. वसंत राजस - देवदासी शोध आणि बोध सुगावा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, प्रथमावृत्ती जुलै १९९७, प्रस्तावना पृ. ५.

३. कित्ता ; पृ. ४७.

४. उत्तम कांबळे - देवदासी आणि नग्न पूजा न्यू एज प्रिंटिंग प्रेस, भूपेश गुप्ता भवन, सयानी रोड, मुंबई, चौथी आवृत्ती २००२, पृ.क्र. २८.

५. वसंत राजस; उपरोक्त, पृ. ४७.

६. उत्तम कांबळे; उपरोक्त, पृ. २८.

७. विठ्ठल रामजी शिंदे - धर्म,जीवन,तत्वज्ञान शासकीय मुद्रणालय, लेखनसामग्री भांडार, कोल्हापूर, पृ. ४.

८. गो.मा. पवार - महर्षी विठ्ठल रामजी शिंदे जीवन व कार्य न्यू एज प्रिंटिंग प्रेस, भूपेश गुप्ता भवन, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई, प्रथमावृत्ती मे २००४, पृ. २४९.

९. गो.मा. पवार - विठ्ठल रामजी शिंदे यांची रोजनिशी प्रिटेकस्ट प्रेस, सदाशिव पेठ, टिळक रोड, पुणे, प्रथमावृत्ती २६ जाने. १९७९, पृ. ३.

१०. डॉ.पी.डी.दिघे - महर्षी विठ्ठल रामजी शिंदेचे यांचे आर्थिक व सांस्कृतिक विचार न्यू एज प्रिंटिंग प्रेस, भूपेश गुप्ता भवन, सयानी रोड, मुंबई, दुसरी आवृत्ती मे २००१, पृ. ४१, ४२.

११. उर्मिला पवार व मिनाक्षी मून - आम्हीही इतिहास घडविला
सुगावा प्रकाशन, सदाशिव, पेठ, पुणे,
दुसरी आवृत्ती ८ मार्च २०००, पृ. ३४,३५.

१२. वसंत राजस; उपरोक्त, पृ. ४८.

१३. उर्मिला पवार व मीनाक्षी मून; उपरोक्त, पृ. ३५.

१४. बळवंत कांबळे - भारतातील देवदासी प्रथा, चळवळ आणि पुनर्वसन
श्रीविद्या प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे,
प्रथमावृत्ती १८ मे २०००, पृ. ३९.

१५. उर्मिला पवार व मीनाक्षी मून; उपरोक्त, पृ. ३६.

१६. गो.मा. पवार; उपरोक्त, पृ. २५०.

१७. उर्मिला पवार व मीनाक्षी मून; उपरोक्त, पृ. ३७.

१८. गो.मा. पवार; उपरोक्त, पृ. २५०.

१९. उर्मिला पवार व मीनाक्षी मून; उपरोक्त, पृ. ३८.

२०. बहिष्कृत भारत, ३० जून १९२७, पृ. ७.

२१. मूकनायक, ११ सप्टेंबर १९२०, पृ. ६.

२२. मूकनायक, १६ सप्टेंबर १९२०, पृ. ५, ६.

२३. उर्मिला पवार व मीनाक्षी मून; उपरोक्त, पृ. ३९.

२४. वसंत राजस; उपरोक्त, पृ. ५०.

२५. उर्मिला पवार व मीनाक्षी मून; उपरोक्त, पृ. ३९.

२६. वसंत राजस; उपरोक्त, पृ. ५०.

२७. कित्ता; पृ. ४९.

२८. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे शैक्षणिक व सामाजिक हुकूमनामे - (करवीर सरकारच्या गॅझेटमधील कायदे), पृ. १२१.

२९. चांगदेव भ. खैरमोडे - डॉ. भीमराव रावजी आंबेडकर, भारत भूषण प्रिटिंग प्रेस, गोकुळदास पास्ता रोड,दादर, मुंबई, (खंड-६) पृ.१३०.

३०. उर्मिला पवार व मीनाक्षी मून; उपरोक्त, पृ. ४०.

३१. मूकनायक, ४ नोव्हेंबर १९२७, पृ. ६.

३२. वसंत राजस; उपरोक्त, पृ. ५१.

३३. कित्ता; पृ. ५२.

३४. कित्ता; पृ. ५२.

३५. बळवंत कांबळे; उपरोक्त, पृ. ४२.

३६. पंडित महादेवशास्त्री जोशी - भारतीय संस्कृती कोषखंड - ४ भारतीय संस्कृती कोषमंडळ, पुणे,१९६७, पृ. ४४८.

३७. वसंत राजस; उपरोक्त, पृ. ५३.

३८. बळवंत कांबळे; उपरोक्त, पृ. ४१, ४२.

३९. डॉ. जयसिंगराव पवार - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ आनंद लिमये प्रकाशन, इंडिया प्रिटींग हाऊस, आंबेडकर मार्ग वडाळा, मुंबई, प्रथमावृत्ती जानेवारी २००१, पृ. १०३२.

४०. महाराष्ट्रा कोड व्हॅल्यूम - II पृ. १९४५ ते १९४८.